| MHKO140000011981 | नियमित दिवाणी दावा क्र.३४/१९८१ मधील नि.क्र.३६१ वरील आदेश.<br><br>श्री. अंबाजी बसरगेकर व इतर.<br>वि.<br>श्री. ईश्वर गावडा व इतर. |
|---|---|

वादी यांनी शपथपत्रावर सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३२ नियम ३ नुसार प्रतिवादी क्र.५/४/अ या अज्ञान व्यक्तीसाठी प्रतिवादी क्र.५/४/ब त्याची आई असून त्यांना त्याचे पालक म्हणून सदर दाव्यामध्ये नियुक्त करण्याची विनंती केलेली आहे. सदर अर्जावर प्रतिवादीने म्हणणे दाखल जोरदार हरकत घेवून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०२. वादीच्या कथनानुसार, त्यांनी सदर दावा वाटप, कब्जा व निरंतर मनाई करीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.५/४/अ हा अज्ञान असून प्रतिवादी क्र.५/४/ब ही त्याची नैसर्गिक आई आहे. सध्यस्थितीत प्रतिवादी क्र.५/४/अ चे पालन–पोषण प्रतिवादी क्र. ५/४/ब करत असून त्यांचे हित प्रतिवादी क्र.५/४/अ च्या विरुद्ध नाही. त्यामुळे त्यांनी प्रतिवादी क्र.५/४/ब यांना प्रतिवादी क्र.५/४/अ चे पालक म्हणून नेमण्याची विनंती केली. प्रतिवादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०३. वादीने सदर दावा हा वाटप, ताबा व निरंतर मनाई करीता दाखल केलेला आहे. दाव्यातील नि.क्र.३६२ कडील यादी लगत दाखल असणारे प्रतिवादी क्र.५/४ चे मृत्यू प्रमाणपत्र पाहता ते दि.१३/०५/२०२० रोजी मयत झाल्याचे दिसुन येत आहे. प्रतिवादी क्र.५/४/अ व प्रतिवादी क्र.५/४/ब हे सदर प्रतिवादी यांचे वारस आहेत. प्रतिवादी क्र.५/४/ब यांना प्रतिवादी क्र.५/४/अ यांचे पालक म्हणून नियुक्त केल्यास त्या प्रतिवादी क्र.५/४/अ चे हित चांगल्या प्रकारे पाहतील असे मला वाटते. म्हणून मी, खालील प्रमाणे आदेश पारित करतो.

# आ दे श

०१. वादीचा अर्ज नि.क्र.३६१ मंजुर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी क्र.५/४/ब यांना सदर दाव्याच्या कामी प्रतिवादी क्र.५/४/अ चे पालक म्हणून नियुक्त करण्यात येते.

०३. प्रतिवादी क्र.५/४/ब यांनी प्रतिवादी क्र.५/४/अ चे हिताविरुद्ध कोणतेही काम करणेचे नाही अगर कोणतीही तडजोड करणेची नाही.

Digitally signed by CHARUDATT UDDHAV SHIPKULE
Date: 2023.05.02 17:32:55 +0630

**ठिकाण–चंदगड**
**दिनांक – ०२.०५.२०२३**

**(चारुदत्त उद्धव शिपकुले)**
**सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,चंदगड.**